नियमीत फौजदारी केस क्र.०१/२०२६
सरकार (महा.शासन)
-वि-
विष्णु बांदेकर +०१

**नि. क्र.५३**

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.०३ याची साक्ष -**

**मी याद्वारे असे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :**

माझे नाव : रघुनाथ जगन्नाथ सावे,
वय सुमारे : ८६ वर्षे, धंदा - काही नाही,
राहणार : सावंतवाडी, ता. सावंतवाडी, जि.सिंधुदुर्ग

---

**अभियोग पक्षातर्फे सरतपास सहाय्यक सरकारी वकील श्री.जी.आर. माजगावकर यांचे मार्फत -**

**०१.** मी गोवा येथील हिंदुस्थान सिबा येथुन सन १९९८ मधुन सेवानिवृत्त झालो. सेवानिवृत्त होण्यापुर्वी व नंतर माझे वेतन रूपये १०,०००/- होते. माझी पत्नी पणजी येथील शाळेत शिक्षीका होती. मला दोन मुली आहेत. दोघींची लग्न झाली आहे. मोठी मुलगी हयात नाही. माइ-या पत्नीचे निधन सन २०२४ मध्ये झाले आहे. माइ-या पत्नीचा पगार ९,०००/- रूपयाच्या आसपास होता. माझा पगार HDFC Bank शाखा फोंडा, गोवा येथे जमा होत असे. एकाच बँकेत माझे दोन बचत खाते आहेत. त्याचे क्रमांक ०१६९१५७०००००६६ आणि ०१६९१००००००२२८२ आहेत.

**०२.** घटना १८/११/२०२५ रोजी घडली होती. त्या दिवशी मला एका अज्ञात इसमाचा ७८३९९१८५८१ या नंबरवरून फोन आला. त्या माणसाने मला सांगितले की, मी मुंबई सी.बी.आय ऑफिसमधुन बोलतो आहे. नरेश गोयल यांच्या मनी लॉन्डरिंग केसमध्ये आम्ही चौकशी करतोय आणि याच्यात तुमचे नाव दिसुन येत आहे. त्यांनी सांगितले की, तुम्ही नरेश गोयल कडुन रूपये २५,००,०००/- घेतले आहे आणि मनी लॉन्डरिंगसाठी तुमचे

डॉक्युमेंट्स त्यांना दिले आहे. त्याची आम्हाला तुमच्याकडे चौकशी करायची आहे. त्यानी सांगितले की, दोन प्रकारे चौकशी करता येईल. ऑनलाईन आणि फिजीकल. फिजीकल साठी तुम्हाला ९० दिवस आमच्याकडे रहावे लागेल. आणि ही बातमी कुणालाही कळता उपयोगी नाही. मी ऑनलाईन चौकशी पसंत केली. का तर घरी राहुन उत्तरे देता येतील. हे संभाषण इंग्रजीमध्ये चालले होते. मग त्याने प्रश्न विचारायला सुरवात केली. त्यानी विचारले की, मुल काय करतात?, कुठे राहतात ?, मी पण प्रामाणिकपणे उत्तरे दिली. त्यांनी सदरची चौकशी व्हीडीओ कॉल वर केली, त्यांनी त्यांचा चेहरा मला कधीच दाखवला नाही. पण प्रत्येक वेळी माझा चेहरा कन्फर्म करत होते.

**०३.** त्यांनी मला माइ-याकडील फिक्स डिपोझीट, म्युचल फंडची व शेअर्सची सर्व रक्कम माइ-या HDFC Bank शाखा सावंतवाडी मधील शाखेतील खाते क्र.०१६९१००००२२८२ या खात्यात जमा करण्यास सांगीतले. या खात्याचे चेक बुक माइ-याकडे नव्हते. त्यामुळे मला रक्कम आरटीजीएस करता येत नव्हती. म्हणुन मी HDFC Bank शाखा सावंतवाडी चे मॅनेजर गावडे यांना फोन करून विंनती केली की, माइ-या खाते क्रमांक ०१६९१००००२२८२ मधील रक्कम रूपये ५५,००,०००/- (रूपये पंचावन्न लाख फक्त) माझे खाते क्रमांक ०१६९१५७००००६६ मध्ये वर्ग करावी. मॅनेजर गावडे माइ-या घरी आले व त्यांनी विचारले एवढी रक्कम कशासाठी पाहिजे. मी त्यांना खोटे सागितले की, मला प्रॉपर्टी घ्यायची आहे दिल्लीला. अज्ञात इसमाने दिलेल्या ICICI बँकेचे खाते क्रमांक ४११५०५०००५१९ मध्ये आरटीजीएस ने रक्कम रूपये ५५,००,०००/- (रूपये पंचावन्न लाख फक्त) दिनांक २०/११/२०२५ रोजी वळती केली. अमाऊंट ट्रान्सफर झाल्याबरोबर त्याने मला व्हॉट्सअॅपवर पैसे मिळाले म्हणुन रिसीप्ट दाखवली.

**०४.** त्यानंतर त्यानी शेअर्स आणि म्युचल फंड लिक्वीडेट करून

घेण्यास व्हीडीओ कॉल वरून सांगितले. त्यानंतर मी सदरची रक्कम मुंबई येथील ICICI बँक खाते क्रमांक १०१२०५००२३२६ रक्कम ४२,००,०००/- (रूपये बेचाळीस लाख फक्त) आरटीजीएस व्दारे दिनांक २४/११/२०२५ वळती केली. रक्कम मिळाल्याची रिसीप्ट त्याने मला व्हॉट्सअॅप कॉलवर दाखवली. त्यानंतर २५ तारखेला पण त्याने मला परत परत फोन करायला सुरवात केली. आमच्या परवानगीशिवाय कुठेही जायचे नाही, जायचे असेल तर जामीन द्यायला पाहिजे असे मला म्हणाले. जामीन एक कोटीचा रूपयांचा द्यायला पाहिजे असे सांगितले. मी म्हणालो माइ-या कडे इतके पैस कोठुन येणार. थोड्या वेळांनी त्यांचा फोन आला. एक कोटी देता येत नाही तर तीस लाख द्या. मी त्यांना सांगितले की, तीस लाख तरी कोठुन आणणार. थोड्या वेळाने परत फोन आला. तीस लाख नाही तर पंधरा लाख द्या. तुम्हाला जामीन मिळण्यासाठी मी सुप्रीम कोर्टात प्रयत्न करतो असे म्हणाला. त्यांनी मला न्यायालयातील दृश्य दाखवले. या सर्व घटनेमुळे माझी फसवणुक झाली.

**०५.** मुलीसोबत बॅकेत जावुन पाहणी केली असता. वरील नमुद सर्व व्यवहाराबाबत खात्री केली असता व्यवहार झाल्याचे निदर्शनास आले. बॅंकेनी आम्ही सांगितले की, तुमची फसवणुक झाली आहे. १९३० ला फोन करून सायबरला तक्रार केला. माइ-या मुलीने ताबडतोब फोन केला. दिनांक २६/११/२०२५ रोजी मी पोलीस ठाणे सावंतवाडी येथे तक्रार केली. ती आज मला दाखवली. त्यातील मजकुर बरोबर असुन त्यावर माझी आणि मुलीची व पोलीसांची सही आहे. त्याला **नि.पी–८/पीडब्ल्यु–३** देण्यात येते. आता छापील एफआयआर दाखवली. त्यातील मजकुर बरोबर असुन त्यावर माझी सही आहे. त्याला **नि.पी–९/पीडब्ल्यु–३** देण्यात येते.

**०६.** चौकशी दरम्यान पोलीसांनी माइ–याकडुन माझा मोबाईल

घेतला होता. त्यातुन त्यांनी अज्ञात इसमाशी ७८३९९१८५८१ या क्रमांकावर झालेला व्हॉट्सॲप व व्हीडीओ कॉल संदर्भातील सर्व माहिती पोलीसांनी काढुन घेतली होती. पोलीसांनी माहिती त्यांच्या लॅपटॉप मध्ये काढुन घेतली होती.

**०७.** साक्षीदारांने आपण ६५ब चे प्रमाणपत्र दिले नसल्याचे सांगितले. फेरिस्ट नि.क्र.५२/१ कडील प्रमाणपत्र दाखवुन पुन्हा विचारले असता त्यांनी आपणच सदरचे प्रमाणपत्र दिल्याचे, त्यातील मजकुर बरोबर असल्याचे व त्यावर आपली सही असल्याचे मान्य केले. सबब, सदर प्रमाणपत्रास **नि.पी–१०/पीडब्ल्यु–३** देण्यात आली.

**०८.** अज्ञात इसमाने व्हॉट्सॲप वरून मला पैसे पोचल्याचे दोन पावत्या पाठविल्या होत्या. नरेश गोयल यांच्याकडुन पैसे घेवुन तुमचे कागदपत्र वापरण्यास त्यांना दिले अशी नोटीस आल्याचे देखील त्यांनी व्हॉट्सॲप वरून दाखवले. पैसे पोचल्याचे पावत्या मी पोलीसांना दिल्या. आरटीजीएस च्या पावत्या पोलीसांना दिल्या होत्या किंवा कसे हे मला आठवत नाही. पोलीसांना मी, मराठीत लिहलेली सुसाईड नोट दिली होती. अज्ञात इसमाने सुप्रीम कोर्टात बेलसाठी अर्ज कसा द्यायचा तो इंग्रजीमध्ये सांगितला, त्याच्या सांगण्यानुसार मी तो संपुर्ण लिहुन काढला होता. तो अर्ज मी पोलीसांकडे दिला होता. तो **नि.पी–२/पीडब्ल्यु–२** कडे आहे.

**०९.** दिनांक ०७/१२/२०२५ रोजी सावंतवाडी पोलीसांनी मला पोलीस ठाण्यात बोलावले होते. पोलीसांनी मला अटक केलेले दोन आरोपी दाखवले. विष्णु महादेव बांदेकर व शमशेर शब्बीर खान अशी त्यांची नावे होती. दोन्ही आरोपी आजरोजी न्यायालयात हजर असुन मी त्यांना

आळखतो.

**सरतपास पूर्ण.**

**<u>आरोपी क्र.०१ यांच्या विधीज्ञांच्या संमतीने आरोपी क्र.०२ यांचे तर्फे उलटतपास सन्माननीय वकील श्री डी.व्ही.माणगावकर यांचे मार्फत-</u>**

**१०.** हे म्हणणे बरोबर आहे की, माझे शिक्षण बी.एस.सी. एल.एल.बी. आहे. हे म्हणणे खरे आहे की, अज्ञात इसमाने कधीही आपला चेहरा किंवा ओळख मला दाखवली नाही. हे म्हणणे खरे नाही की, अज्ञात इसमाने आपले नाव मला सांगितले नाही. हे म्हणणे खरे आहे की, अज्ञात इसम पोलीस आहे किंवा नाही हे पडताळण्यासाठी मी त्याचेकडे त्याचे ओळखपत्र मागीतले नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी अज्ञात इसमाच्या सांगण्यावरून रक्कम वळती केली त्यावेळी अज्ञात इसम माइ-या संपर्कात नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, ज्या खात्यांना मी रक्कम वळती केली, त्या खातेदारांना मी ओळखत नव्हतो. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांना मी मोबाईल दिल्यानंतर त्यांनी त्याचे पुढे काय केले हे मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांचा लॅपटॉप कोणत्या कंपनीचा व कोणत्या मॉडेलचा होता, हे मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रिंटा कोणत्या प्रिंटरमधुन काढल्या हे मला माहिती नाही.

**<u>न्यायालयाची वेळ संपल्याने उलटतपास पुढील तारखेपर्यत तहकुब केला.</u>**

श्रवणोत्तर स्विकृत,

Digitally signed by SONIAJYOTI AJIT KANSHIDE
Date: 2026.06.19 18:37:12 +0530

ठिकाण :- ओरोस
दिनांक :- १९/०६/२०२६.

**( श्रीमती एस.ए.कानशिडे )**
अति.मुख्य न्यायदंडाधिकारी,
सिंधुदुर्ग-ओरोस.